# मुलांसाठी बाइबल

प्रस्तुत

# श्रीमंत मनुष्य, गरिब मनुष्य



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Alastair Paterson; M. Maillot; Lazarus

रूपान्तरकार: M. Maillot; Sarah S.

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2020 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही तो कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

पुष्कळ धार्मिक पुढारी देवावर प्रीति करण्याऐवजी पैशांवर प्रीति करतात हे येशूला माहित होते. दोन मनुष्यांचे काय झाले, तसेच देवाशिवाय श्रीमंती निरुपयोगी का आहे हे त्याने सांगितले. श्रीमंत मनुष्य देवाकडून स्वर्गात जीवन विकत घेऊ शकत नाही.



एका गावात एक श्रीमंत मनुष्य
राहात होता त्याचे कपडे फारच
सुंदर होते ते विकत घेण्यास
त्याला पुष्कळ पैसा लागला
होता. त्याचा पेहराव राजा
सारखा असे.



श्रीमंत मनुष्याचे भोजन देखिल उत्कृष्ठ असे. प्रत्येक वेळेचे भोजन जणूकाय मेजवानीच राहात असे. त्याच्याकडे ऐवढा पैसा होता की जेंव्हा केंव्हा त्याला न्याहारीसाठी, दुपारच्या भोजनासाठी, रात्रीच्या भोजनासाठी किंवा दरम्यानच्या वेळेत खाण्यासाठी लागणारा फराळ केंव्हाही
विकत घेता येऊ शकत होता.



या श्रीमंत मनुष्याच्या घराच्या फाटकात गरिब, उपासमारीने हडकुळ्या झालेला असा एक भिकारी पडून राहात असे. त्याचे नाव लाजर असे होते.





बिचाऱ्या लाजरचे जीवन
दुःखाने भरलेले होते. त्याला
कदाचित एखादा आजार
देखिल झाला असावा. त्याला
कदाचित इतरांकडून इजा
आणि दुखापत झाली असावी.
त्याला दुध आणि भाजीपाला
किंवा मटन यांसारखे चांगले
अन्न मिळत नसल्यामुळे त्याला
कदाचित त्रास होत असावा.

लाजर जेवणाची
वाट पाहात असे.
श्रीमंत मनुष्याच्या
जेवणाच्या
मेजावरुन खाली
पडलेले अन्न
खाण्यात देखिल
त्याला आनंद
वाटला असता.



रस्त्यावरची कुत्रे देखिल काही वेळा बिचाऱ्या गरिब असहाय्य भिकाऱ्यासोबत येऊन राहात असे. ते त्याच्या अवतीभोवती राहात असत व त्याचे फोड चाटीत असत. असे वाटते की लाजरची उपासमार होत आहे याची कोणालाही काळजी नव्हती.



एके सकाळी लाजर
झोपेतून उठला
नाही. बिचारा गरीब
उपासमार झालेला,
मित्रहिन असा
भिकारी हे जिवन
सोडून गेला होता.
लाजर मरण
पावला होता.



ज्या क्षणी तो मरण पावला त्याचक्षणी
लाजरच्या आनंदाला सुरवात झाली. येशूने म्हटले
देवदुतांनी येऊन त्याला अब्राहामाच्या जवळ नेऊन ठेवले.
देवाने लाजराचे समाधान केले.



श्रीमंत मनुष्य देखिल मरण पावला. त्याच्याजवळील पैसा त्याचा जीव वाचवू शकले नाही. जेंव्हा मरण येते तेंव्हा त्याला कोणीही थांबवू शकत नाही.



श्रीमंत मनुष्याला पुरण्यात आले. कदाचित त्याची खुप मोठी उत्तरक्रिया करण्यात आली असावी. श्रीमंत मनुष्य हुशार आणि यशस्वी होता असे सांगून लोकांनी कदाचित त्याची स्तुति केली असावी. परंतु त्यांच्या स्तुतिने त्याला मदत झाली नाही. तो श्रीमंत मनुष्य नरकात गेला.



नरकात, श्रीमंत मनुष्याने आक्रोश केला, "हे बापा अब्राहामा, माझ्यावर दया करुन लाजराला पाठीव, ह्यासाठी की त्याने आपल्या बोटाचे टोक पाण्यात बुडवून माझी जीभ थंड करावी; कारण ह्या जाळांत मी क्लेश भोगीत आहे."



"जीवनात तुझ्या जवळ सर्व काही होते परंतू लाजर जवळ काहीही नव्हते," याची अब्राहामने त्याला आठवण करुन दिली. "आता लाजराला समाधान मिळत आहे आणि तू क्लेश भोगित आहे. एवढेच नव्हे तर तुझ्यात व आमच्यात जो दरा आहे तो कोणीही पार करु शकत नाही."





"माझ्या पाच भावांनी येथे येऊन नये म्हणून त्यांना
येथील साक्ष देण्यास लाजराला पृथ्वीवर पाठीव"
अशी कळकळीची विनंती त्या श्रीमंत मनुष्याने केली.
"कारण या क्लेशात त्यांच्या जीवनाचा शेवट व्हावा
असे मला वाटत नाही."



अब्राहामने त्याला उत्तर दिले, "तुझ्या भावांकडे देवाचे वचन आहे." ते पाच भाऊ जर देवाचे वचन म्हणजे पवित्र शास्त्रावर विश्वास करित नसतील, तर लाजर मरणातून जिवंत झाला तरी देखिल ते विश्वास करणार नाही.



जेंव्हा येशूने श्रीमंत मनुष्य आणि लाजराची गोष्ट सांगणे
संपवले, तेंव्हा कदाचित धर्मपुढारी लोकांनी स्वतःला असे
विचारले असावे, "देवावर मी जितकी प्रीति करतो
त्याच्यापेक्षा मी श्रीमंतीवर अधिक प्रीति करतो काय?"
देवाच्या वचनाप्रमाणे जीवन न जगल्यास काय
होईल याविषयी आता त्यांना चागल्या
रितीने माहिती होती.



# श्रीमंत मनुष्य, गरिब मनुष्य

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

लूक १६

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी
येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16